27-04-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 04/26/2025 11:10 PM Page 1



# उभो गुणो, मधले तळप येथे पर्यटकांना बंदी घाला

## स्थानिकांनी मागणी : प्लास्टिक पिशव्या, बाटल्यांचा खच, परिसर बनला विद्रुप

टीम दैनिक हेराल्ड





**केरी, दि. २६ :** सत्तरी तालुक्यातील मोर्ले गावातून वाहणाऱ्या वाळवंटी नदीच्या संरक्षणासाठी स्थानिक युवकांनी पुढाकार घेतला आहे. उन्हाळ्यात या नदीतील उभो गुणो', मधले तळप' आणि करकार' या डोहांमध्ये आंघोळी करण्यासाठी मोठ्या संख्येने पर्यटक येत आहेत. मात्र, हे पर्यटक नदीकिनारी धांगडधिंगा घालणे, जेवण बनवणे, मद्यपान करणे आणि प्लास्टिक व दारूच्या बाटल्यांचा कचरा फेकून परिसर विद्रूप करत आहेत. त्यामुळे या ठिकाणी पर्यटकांना बंदी घालावी आणि नदीकाठ सुशोभीत ठेवावा, अशी जोरदार मागणी स्थानिकांकडून होत आहे.

नदीतील 'उभो गुणो', मधले तळप' आणि करकार' या तीन प्रमुख ठिकाणी पर्यटकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी वाढली आहे. या ठिकाणी कचरा टाकणे, असभ्य वर्तन करण्याचे प्रकार घडत आहे. परिणामी शांतता भंग पावली आहे. त्यामुळे स्थानिकांनी उपजिल्हाधिकारी तसेच मोर्ले व केरी ग्रामपंचायतीकडे लेखी निवेदन सादर करून पर्यटकांवर बंदी घालण्याची मागणी केली आहे.

**बाहेरील पर्यटकांना नो एन्ट्री**

प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई न झाल्यामुळे आता स्थानिक युवकांनीच पुढाकार घेत, बाहेरील पर्यटकांना येथे न घेण्याचा निर्णय घेतला आहे. याचबरोबर नदीच्या रक्षणासाठी 'आमची नदी वाचवूया' या नावाने सोशल मीडियावर ग्रुप तयार करून जनजागृतीही सुरू करण्यात आली आहे.

**२७ एप्रिलला नदी स्वच्छता मोहीम**

'उभो गुणो' आणि करकार' या ठिकाणी गेल्या काही दिवसांत नदीत बुडून दोन मृत्यूची प्रकरणे घडली आहेत. त्यामुळे संतप्त झालेल्या स्थानिकांनी अशा दुर्घटना पुन्हा होऊ नयेत आणि नदी परिसर सुरक्षित राहावा, यासाठी जागृती अभियान सुरू केले आहे. या अभियानाचा एक भाग म्हणून येत्या रविवारी, २७ एप्रिल रोजी सकाळच्या सत्रात उभो गुणो' ते करकार कोंड' पर्यंत नदी पात्राची स्वच्छता मोहीम राबवण्यात येणार आहे. दरम्यान, दोन दिवसापूर्वी येथील काही तरुणांनी उभो गुणो परिसरात स्वच्छता मोहीम राबवून कचरा गोळा केला होता.

येत्या रविवारी या स्वच्छता मोहिमेत सर्वांनी सहभागी व्हावे आणि वाळवंटी नदी वाचवण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन केले आहे.

पान १ वरून

## मांडवीकाठच्या नऊ जेट्टींविरोधात एनजीटीमध्ये याचिका दाखल

याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी सीआरझेड अधिसूचनेच्या कलम ३ चा उल्लेख करत, किनारी भागातील बांधकामे केवळ मासेमारी व संबंधित उपक्रमांसाठीच मर्यादित असावीत, असा युक्तिवाद केला. त्यांनी न्यायाधिकरणाकडे सादर केलेल्या नकाशांमध्ये नऊ जेट्टींचा समावेश असून, त्या व्यावसायिक वापरासाठी वापरल्या जात असल्याचे निदर्शनास आणले, ज्यामुळे सीआरझेड अधिसूचनेचे उल्लंघन होत असल्याचे त्यांनी सांगितले.

## पोलिस सतर्क ; राज्यभर 'कोम्बिंग ऑपरेशन' सुरू

या प्रक्रियेचा उद्देश परिसरातील सुरक्षाव्यवस्था बळकट करणे आणि संभाव्य धोक्यांविरोधात आवश्यक खबरदारी घेणे हा आहे.कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी सर्व आवश्यक उपाययोजना केल्या जात आहेत,असे कळंगुट पोलिस ठाण्याच्या वतीने स्पष्ट करण्यात आले. तसेच, नागरिकांनी कोणतीही संशयास्पद हालचाल आढळल्यास तातडीने पोलिसांना माहिती द्यावी आणि अधिकाऱ्यांना सहकार्य करावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

# पाळोळेत नवीन वीज ट्रान्सफॉर्मरचे उद्घाटन

टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि.२६ :** गोवा विधानसभेचे सभापती तथा काणकोणचे आमदार डॉ. रमेश तवडकर यांनी पाळोळे, पागीवाडा येथील रस्त्याच्या शेवटच्या बाजूला असलेल्या २०० केव्हीए क्षमतेच्या नवीन वीज ट्रान्सफॉर्मरचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी काणकोण पालिकेच्या अध्यक्ष सारा नाईक देसाई, प्रभाग नगरसेवक लक्ष्मण पागी, भाजप काणकोण मंडळाचे सरचिटणीस आणि अखिल गोवा क्षत्रिय पागी समाजाचे अध्यक्ष दिवाकर पागी, भाजप काणकोण मंडळाचे माजी अध्यक्ष विशाल देसाई, नगरसेवक सायमन रिबेलो, गंदेश मडगावकर, नादीन फर्नांडिस, वीज विभागाचे सहाय्यक अभियंता गोविंद भट, कनिष्ठ अभियंता दत्तानंद च्यारी विभागाचे कर्मचारी आणि पाळोळे ग्रामस्थ उपस्थित होते.

पूर्वी, ओव्हरलोडेड ट्रान्सफॉर्मरमुळे या भागात वीज चढउतार होत होते. नवीन २०० केव्हीए क्षमतेच्या ट्रान्सफॉर्मरमुळे आता वीजपुरवठा स्थिर होईल, असे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

# विद्यार्थ्यांसाठी मदत कक्षाची स्थापना

टीम दैनिक हेराल्ड

**विर्नोडा, दि. २६ :** संत सोहिरोबानाथ आंबिये कला आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय विर्नोडा यथे ऑनलाईन प्रवेशासंदर्भात अर्ज भरताना विद्यार्थ्यांना कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी मदत कक्षाची (हेल्प डेस्कची) स्थापना केल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य जुवांव कोस्टा यांनी दिली. ज्या उमेदवारांना अर्ज भरण्याविषयीच्या प्रक्रियेविषयी माहिती नाही किंवा ज्यांना तांत्रिक अडचणी आहेत, अशा विद्यार्थ्यांसाठी हा मदत कक्ष उपयुक्त ठरत आहे. या मदत कक्षात अर्ज कसा भरावा, नोंदणी कशी करावी, वैयक्तिक माहिती कशी भरावी, कोणत्या कोर्ससाठी कॉलेज कसे निवडावे, अर्ज डाउनलोड कसा करुन घ्यावा, या संदर्भात सर्व माहिती मदत कक्षाच्या आधारे विद्यार्थ्यांना दिली जात आहे.

आंबिये महाविद्यालयात चार नवे अभ्यासक्रम सुरू झाले असून यामध्ये बीबीए, बीएसस्सी इन बायोटेक्नॉलॉजी, बीएससी इन स्पोर्ट्स ॲण्ड एक्सरसाईज सायन्स, बीएससी इन सायकॉलॉजी यांचा समावेश आहे. अधिक माहितीसाठी आणि प्रवेशासाठी मदत कक्षाशी संपर्क साधावा.





फोंडा : कुर्टी येथे संत समागमाचे उद्घाटन करताना प्रिया च्यारी, अमीना नाईक, आदर्श तोरसकर, दीपक केदार, नम्रता परूळेकर, खुशाली नाईक व इतर.

# मुलांना अभ्यासात गुंतवून ठेवा

**विष्णू पारोडकर : विवेकानंद शिशुसंस्कार केंद्राचे बक्षीस वितरण उत्साहात**

टीम दैनिक हेराल्ड





साखळी, दि. २६ : आजकाल मुले मोबाईलचा वापर खूप करतात. पालकांनी मुलांना कमी प्रमाणात मोबाईल वापरायला दिला पाहिजे. मोबाईलमुळे डोळ्यांना त्रास होतो. लहान वयातच मुलांच्या डोळ्यांना त्रास झाल्यास भविष्यात त्यांना आणखीन त्रास होऊ शकतो. मुलांना खेळामध्ये किंवा अभ्यासात गुंतवून ठेवले पाहिजे, असे केरी युथ क्लबचे अध्यक्ष विष्णू पारोडकर यांनी सांगितले.

केरी-सत्तरी येथील स्वामी विवेकानंद स्मृती संघ संचालित विवेकानंद शिक्षण संस्थेच्या विवेकानंद शिशू संस्कार केंद्र या पूर्व प्राथमिक विद्यालयाचे स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न झाले.यावेळी प्रमुख पाहुणे या नात्याने ते बोलत होते.

या कार्यक्रमाला खास निमंत्रित ओम साई सेवा आश्रम मठाचे प्रमुख गोपीनाथ गाड, शिक्षण संस्थेचे अध्यक्ष नामदेव गावस, पालक शिक्षक संघाचे अध्यक्ष संदीप गाड, पालक रुपेश गावस, संतोष गावस, विवेकानंद ज्ञान मंदिर हायस्कूलच्या ज्येष्ठ शिक्षिका सिंथिया फर्नांडिस आदी उपस्थित होते.

दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. नामदेव गावस यांनी स्वागत केले. त्यानंतर मुलांसाठी व पालकांसाठी वर्षभरात घेतलेल्या विविध स्पर्धांचे मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी बोलताना

यावेळी गोपीनाथ गाड यांनीही आपले विचार मांडले. मान्यवरांना भेटवस्तू प्रदान करण्यात आल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन फिझा बी पिरखान यांनी केले. बक्षीस वितरणची नावे पूजा शेटकर यांनी वाचली तर पूजा परवार यांनी आभार मानले.

# संत समागम संस्कार केंद्र व्हावे ही काळाची गरज

टीम दैनिक हेराल्ड

**प्रिया च्यारी : संत समाज फोंडाच्या वतीने नवीन संत समागम उद्घाटन सोहळा**

**फोंडा, दि. २६ :** संत समागम केंद्र व्हावी ही आजच्या काळाची गरज आहे. कारण आत्ताच्या पिढीकडे धर्म संस्कार कमी दिसतात, त्यामुळे त्यांच्याकडे एकाग्रता कमी झाली, जाणत्याचे ऐकत नाही, मोबाईलमध्ये गुरफटलेल्या पिढीला धर्म शिक्षणाची नितांत गरज आहे व त्याही पेक्षा आजच्या महिला वर्गालाही याची गरज आहे. ब्रह्मेशानंद स्वामींनी विविध उपक्रमातून समाजाला सन्मार्गाची वाट दाखवलेली आहे, असे कुर्टी खांडेपार जिल्हा पंचायत सदस्य प्रिया च्यारी यांनी सांगितले.

श्री दत्त पद्मनाभ पीठाचे पिठाधीश्वर धर्मभूषण पद्मश्री विभूषित सद्गुरू ब्रह्मेशानंद स्वामींच्या दिव्य मार्गदर्शनाने संत समाज फोंडाच्या वतीने नवीन संत समागम उद्घाटन सोहळा प्रभूनगर फोंडा येथे मोठ्या उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमात जिल्हा पंचायत सदस्य प्रिया च्यारी, माजी नगरसेविका अमिना नाईक,उद्योजक आदर्श तोरस्कर, संत समाज फोंडा अध्यक्ष नम्रता परुळेकर, सचिव खुशाली नाईक, तपोभूमीचे उपाध्याय धर्म प्रचारक दीपक केदार, जगत् जननी संस्थेच्या खजिनदार ऋचा केरकर, उपाध्यक्ष तन्वी नाईक, उद्गाता दिक्षा परुळेकर, धर्म शिक्षिका ईशा भामईकर यांची उपस्थित होते.

अध्यक्ष परुळेकर यांनी आपल्या प्रस्तावनेत सांगितले की, गोवा, महाराष्ट्र व कर्नाटक मिळून एकूण ७२ संत समाजामार्फत संत समागम हे धर्म संस्कार व धर्म शिक्षणाचे केंद्र म्हणून सुरू करण्यात आलेली आहेत. बालवृद्धापासून सर्व वर्गांना विविध देवदेवतांची स्तोत्रे, श्लोक, पूजा, दैनंदिन आचरण, विविध धर्म ग्रंथावर प्रबोधन,धर्मशास्त्र इत्यादी अभ्यासाची शिकवणी केली जाणार आहे.उद्घाटन सोहळ्याचे सूत्रसंचालन रुपेश भामईकर तर आभार खुशाली नाईक यांनी केले.

# हिंदू धर्मियांबाबत वादग्रस्त स्टेटस ठेवणाऱ्या शिक्षिकेविरोधात तक्रार

टीम दैनिक हेराल्ड

**बांदा, दि. २६ :** आपल्या मोबाईल व्हाट्सअॅपवर हिंदू धर्मियांच्या भावना दुखावणारा स्टेटस ठेवणाऱ्या बांदा शहरातील महिला शिक्षिकेविरोधात हिंदू एकता मंच आक्रमक झाले असून या शिक्षिकेविरोधात बांदा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. या प्रकरणाचा अधिक तपास अप्पर पोलिस अधीक्षक कृषिकेश रावले करत आहेत.

संबंधित शैक्षणिक संस्थेने देखील या शिक्षिकेला सक्तीच्या रजेवर पाठविले आहे.

पहलगाम – काश्मीर येथे निष्पाप पर्यटकांना त्यांचा धर्म विचारून अतिरेक्यांनी गोळ्या झाडल्या. या घटनेचे तीव्र पडसाद देशभरात उमटले असून या घटनेचा व कृत्याचा जाहीर निषेध होत आहे. मात्र बांदा शहरातील एका शिक्षिकेने गुरुवारी रात्री आपल्या व्हाट्सअॅपवर हिंदू धर्मीयांच्या भावना दुखावणारा स्टेटस ठेवत या घटनेला अप्रत्यक्ष पाठिंबा दिल्याचा आरोप हिंदू एकता मंचने केला होता. शुक्रवारी सकाळीच शहरातील हिंदू धार्मियांनी बांदा पोलिस ठाणे गाठत पोलिस निरीक्षक विकास बडवे यांची भेट घेत चर्चा केली. संबंधित शिक्षिकेवर तात्काळ गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली. त्यानुसार पोलिस ठाण्यात तक्रार अर्ज करण्यात आला.

त्यानंतर संबंधित महिलेच्या शाळेत धडक देत हिंदू एकता मंचच्या कार्यकर्त्यांनी तक्रार दिली. जोपर्यंत या शिक्षिकेला बडतर्फ करण्यात येत नाही, तोपर्यंत शहरातील मुले शाळेत न पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे या शिक्षिकेला तात्काळ सक्तीच्या रजेवर पाठविण्यात आले.

यावेळी बोलताना हिंदू एकता मंचाचे निलेश सावंत यांनी सांगितले की, बांद्याची एकी ही जिल्ह्यात सर्वश्रुत आहे. मात्र शिक्षिकेने केलेला प्रकार हा संतापजनक आहे. यापूर्वी देखील तिने समाजमाध्यमावर अशाच आशयच्या पोस्ट टाकून जातीय तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्याचे सर्व पुरावे पोलिसांना देण्यात आले आहेत. यापुढे अशा प्रकारांना बांद्यात थारा दिला जाणार नाही.


केनरा बैंक Canara Bank
भारत सरकार का उपक्रम A Govt. of India Undertaking
सिंडिकेट Syndicate

क्षेत्रीय कार्यालय गोवा, पहिला मजला, मतियाज प्लाझा, 18 जून मार्ग, पणजी, गोवा –403001
दूर.क्र. 0832-2220324, मोबा. 7774060757, ईमेल : npraogoa@canarabank.com

**ई–लिलाव विक्री सूचना** सक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, 2002 च्या नियम ८(६) मधील तरतुदींखाली स्थावर मालमत्तांच्या विक्रीसाठी ई–लिलाव

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 सह सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, 2002 च्या तरतुदींखाली येथे खाली वर्णिलेल्या स्थावर मालमत्ता व जंगम मालमत्ता ज्या ताब्यात घेण्यात आल्या आहेत त्या जाहीर लिलावाने विकल्या जातील, अशी नोटीस याद्वारे देण्यात येत आहे.

लिलावाची तारीख व वेळ : **29.05.2025** (विक्री पूर्ण होईपर्यंत ५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह). लिलाव प्रणाली : ई–लिलाव (ऑनलाईन), लिलावाचे ठिकाण : **https://baanknet.com/**, ऑनलाईन लिलाव सेवा पुरवठादाराचा तपशील : मेसर्स पीएसबी अलायन्स (बॅकनेट), संपर्क क्र. **8291220220**
ईमेल आयडी : **support.BAANKNET@psballiance.com**, विक्री नोटीस तारीख **25/04/2025**.

| कर्जदार /हमीदाराचे नाव आणि शाखा | ज्ञात भारांसह, काही असल्यास, स्थावर मालमत्तेचे तपशील आणि पूर्ण वर्णन, राखीव किंमत, ब.र.ठेव, लिलाव वेळ, बोलीवाढ मूल्य, यादिवशी दायित्व |
|---|---|
| **श्री. शिवानंद मडकर,** 174, बायरो, आल्त आसगाव, उत्तर गोवा, म्हापसा, गोवा–403507 **श्रीमती शमिका मडकर,** 174, बायरो, आल्त आसगाव, उत्तर गोवा, म्हापसा, गोवा–403507 | इल्हासच्या भू निबंधक कार्यालयात न वर्णिलेला परंतु मात्रिज क्र. 12 (जुना) खाली तालुका महसूल कर्यालयात नोंदवलेला प्लॉट जो करमळी ग्रामपंचयातीच्या हद्दीत करमळी येथे असलेल्या टेरेनो डी कारपेंटरो नावाच्या करमळी गावाच्या सर्व्हे क्र. 271-6 असलेल्या 1925 चौ.मी. क्षेत्रफळाच्या मोठ्या मालमत्तेचा भाग असलेल्या प्लॉट–ए म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेत प्लॅटीमन रेसिन्स या नावाच्या इमारतीत 27 चौ.मी. क्षेत्रफळ असलेल्या गाळा क्र. एस–१ या मालमत्तेचा संपूर्ण भाग. **मालमत्तेच्या चतु:सीमा : उत्तरेस** : जुआंव कायतानो लोबो यांची मालमत्ता, **दक्षिणेस** : श्रीमती अना मारीया लॉर्डेस सिल्वेरा ई परेरा यांच्या मालमत्तेचा उर्वरित भाग, **पश्चिमेस** : सार्वजनिक रस्ता, **पूर्वेस** : किल्ला या नावाने ओळखली जाणारी मालमत्ता. प्रतिकात्मक ताब्यातील युनिट. |
| | **31.03.2025** रोजी एकूण दायित्वे : रु. **41,09,339.00/-** (रु. एक्केचाळीस लाख नऊ हजार तीनशे एकोणचाळीस फक्त)अधिक त्यापुढील व्याज, चार्जेस व इतर खर्च, काही असल्यास. |
| शाखा : पर्वरी (2862) दूर.क्र. : 7774060750 - 0832-2413955 | **राखीव किंमत** : रु. **10,20,000/- (रु. दहा लाख वीस हजार फक्त), ईएमडी रक्कम** : रु. **1,02,000/- (रु. एक लाख दोन हजार फक्त). बोली वाढ रक्कम** : रु. **25,000.00 (रु. पंचवीस हजार फक्त). लिलाव वेळ : दुपारी 12.00 ते 12.30.** |
| **मे. गोवन फुड्स एन्टरप्रायजेस,** प्लॉट क्र. 17, ऑटोनगर बडाबा रोड, कियाद्व इंडस्ट्रीयल एरीया, रामतीर्थ नगर, बेळगावी, कर्नाटक–590016. **श्री. फहीद मोहम्मद शेख (प्रोप्रायटर),** फ्लॅट क्र. 5, 4 था मजला, गोल्ड न हाईट्स, पाजीफोंड, मडगाव, गोवा 403601. **श्री. फहीद मोहम्मद शेख (प्रोप्रायटर),** घर क्र. 37–ए, इल्यास बिल्डींग, टू क्रॉस चॅनेलजवळ, मारुती मंदिर रोड, कादर अपार्टमेंटसमोर, रहीम मंजीलमागे, इंडोना, लयमत दवर्ली, सालसेत, मडगाव–403707. **श्री. परवीन फहीद शेख (हमीदार),** 59 सेंट अँथोनी स्कूलसमोर, पाजीफोंड, मडगाव, दक्षिण गोवा, गोवा 403601. **श्रीमती हनिफा शेख (हमीदार),** 59 सेंट अँथोनी स्कूलसमोर, पाजीफोंड, मडगाव, दक्षिण गोवा, गोवा 403601. **श्रीमती मिशेल फातिमा शेख (हमीदार),** 59 सेंट अँथोनी स्कूलसमोर, पाजीफोंड, मडगाव, दक्षिण गोवा, गोवा 403601. | पाजीफोंड, मडगाव येथील मडगाव शहर सर्वेक्षणाच्या पीटी शीट क्र. 205 च्या चलता क्र. 41 व 42 खाली सर्वेक्षित क्र. 563 (अर्बन) व 502 (रस्टीक) खाली मात्रिज मध्ये नोंदवलेली मालमत्तेवर बांधलेल्या 12.00 चौ.मी. क्षेत्रफळाच्या स्लीट पार्किंग क्र. 1 आणि 108.55 चौ.मी. सुपर बिल्ट अप क्षेत्रफळाच्या गोल्ड हाईट्स बिल्डींगमधील चवथ्या मजल्यावरील फ्लॅट क्र. 5 या मालमत्तेचा संपूर्ण भाग. **चतु:सीमा पुढीलप्रमाणे : उत्तरेस** : बाल्कनी, **दक्षिणेस** : बाल्कनी, **पूर्वेस** : लिफ्ट ब्लॉक, **पश्चिमेस** : याच फ्लॅटची बेडरूम. ✲ प्रतिमात्मक कब्जाखालील युनिट. |
| | **दि. 31.03.2025 रोजी एकूण दायित्वे** : रु. **69,86,623.93/- (रु. एकोणसत्तर लाख शहाऐंशी हजार सहाशे तेवीस व पैसे त्र्याण्णव फक्त) अधिक त्यापुढील व्याज, चार्जेस व इतर खर्च, काही असल्यास.** |
| एसएमई मडगाव शाखा (5242) दूर.क्र. 0832-2860018 / 9004139406 | **राखीव किंमत** : रु. **34,50,000/- (रु. चौतीस लाख पस्तीस हजार फक्त), ईएमडी रक्कम** : रु. **3,45,000/- (रु. तीन लाख पंचेचाळीस हजार फक्त). बोली वाढ रक्कम** : रु. **25,000.0० (रु. पंचवीस हजार फक्त). लिलाव वेळ : दुपारी 2.00 ते 3.00** |
| **श्री. बारेमन छप्परबंद (कर्जदार),** घर क्र. 927, फ्लॅट क्र. एफएफ 4, कुडचडे ट्रेड सेंटर बिल्डींग, रेल्वे स्टेशनजवळ, कुडचडे, मोबा. क्र. 9067893917. **श्रीमती अल्लांबी बारेमन छप्परबंद (कर्जदार),** क्र. 905, कुड्डेगळ, सावर्डे, गोवा 403706. **अभय कुमार आर. पाटील (हमीदार),** घर क्र. 900, फोमेंतो माईन्स, कुड्डेगळ, सांतोना, कुडचडे, गोवा, भारत 403706. | कुडचडे नगरपालिका क्षेत्रात असलेल्या व कुडचडे गावाच्या सर्व्हे क्र. 224/4ए व ३ए मध्ये असलेल्या बर्फाच्या पॅक्टरीच्या समोर मार्केट सेंटरपासून 1/2 कि.मी. अंतरात कुडचडे शहरातील कुडचडेच्या बिल्डींग वॉर्डकडे रेल्वे स्टेशनपासून मेन रोड कौन्सिल रोडवर असलेल्या कुडचडे ट्रेड सेंटर नावाच्या इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील फ्लॅट क्र. एफ–4. **चतु:सीमा : पूर्वेस** : खुली जागा, **पश्चिमेस** : फ्लॅट क्र. आरएफ एफ–3, **उत्तरेस** : खुली जागा, **दक्षिणेस** : खुली जागा. ✲ प्रतिमात्मक कब्जाखालील युनिट. |
| | **दि. 31.03.2025 रोजी एकूण दायित्वे** : रु. **29,78,572.46/- (रु. एकोणतीस लाख अठ्ठ्याहत्तर हजार पायशे बहात्तर व पैसे सेहेचाळीस फक्त) अधिक त्यापुढील व्याज, चार्जेस व इतर खर्च, काही असल्यास.** |
| शाखा : कुडचडे (17203) दूर.क्र. 0832-2650504, 9977223997 | **राखीव किंमत** : रु. **18,30,000/- (रु. अठरा लाख तीस हजार फक्त), ईएमडी रक्कम** : रु. **1,83,000/- (रु. एक लाख त्र्याऐंशी हजार फक्त). बोली वाढ रक्कम** : रु. **25,000.00 (रु. पंचवीस हजार फक्त). लिलाव वेळ : सकाळी 11.30 ते 12.00** |

**इतर अटी व शर्ती :** अ) सदर मालमत्ता भारांसह, काही असल्यास, **जसे आहे जेथे आहे, जे आहे जे काही आहे आणि तेथे जे जे काही आहे या तत्वावर** विकल्या जातील. ब) मालमत्ता राखीव किंमतीपेक्षा जास्त किमतीला विकल्या जातील. क) प्राधिकृत अधिकाऱ्यांची पूर्ववेळ घेऊन कोणत्याही कामाच्या दिवशी सकाळी 11.00 ते संध्या. **5.00** या कार्यालयीन वेळेत मालमत्तेची पाहणी करता येईल. ड) इच्छुक बोलीदारांनी मे. पीएसबी अलायन्स प्रायव्हेट लिमिटेड **(Baanknet.com)** पोर्टलच्या अनुसार राखीव किमतीच्या **10%** दराने ई–वलेटमध्ये थेट बयाणा रक्कम ठेवीचा (ईएमडी) **2.05.2025** रोजी संध्या. **5.00** पर्यंत जमा करावी किंवा सदर चलनात दिलेल्या खाते तपशीलात आरटीजीएस/एनईएफटी द्वारे ईएमडी चलान तयार करून जमा करावी. लिलाव बोली फक्त **https://BAANKNET.COM** या संकेतस्थळावरून **29.05.2025** रोजी ऑनलाईन इलेक्ट्रॉनिक बिडींग द्वारेच केल्या जातील. अधिक तपशीलसाठी वरील शाखांना कोणत्याही कामाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत संपर्क करावा किंवा सेवा पुरवठादार मे. पीएसबी अलायन्स **(Baanknet.com)** संपर्क तपशील : मेसर्स पीएसबी अलायन्स **(https://BAANKNET.COM)** – **8291220220** ईमेल आयडी : **support.Baanknet@psballiance.com** फ) जर बोलीदारांना इंटरनेटची सुविधा नाही परंतु ई–लिलावात भाग घ्यावयाचा असल्यास त्यांनी संबंधित मंडल कार्यालय किंवा एआरएम शाखेशी संपर्क करावा जे सुविधा केंद्र म्हणून आवश्यक व्यवस्था करतील.

दिनांक : **25.04.2025,** ठिकाण : पणजी

**सही/–**
**प्राधिकृत अधिकारी**



**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given to the Public in general that my client Mr. Sreenivasulu Lakkipogu Ramaiah is the owner of All that Flat no. 202K bearing Municipal H. no. 2/202/K(10) having a built up area of 74 square meters on the Ground floor of building “SHALOM APARTMENTS” along with the undivided proportionate share of land corresponding to the said land constructed in plot (Lote) no. 13 joining part or property known as 'MORNATANGA” or “MARNA TANGA” comprehended in plot number Eleven (11) situated at Vaddem, Vasco da Gama, Goa within the limits of Mormugao Municipal Council Taluka and Registration Sub-District of Mormugao District South Goa, in the State of Goa, which property is described in the Office of the Land Registrar Salcete under no. 45759 at page 81 of Boom B-119 of New series and enrolled in the Taluka revenue Office under no. 373 and survey under Chalta no. 20 of P. T. Sheet no. 98 of City Survey Vasco da Gama, Goa.

It is hereby informed to the general Public that the original Deed of Sale dated 08-03-2016, registered before the Sub-Registrar of Mormugao under Registration no. MOR-BK1-00436-2016, CD Number MORD12, Date 09-03-2016 is lost and is not traceable and accordingly Mr. Sreenivasulu Lakkipogu Ramaiah have lodged a Missing Complaint before the Vasco Police Station on 23-04-2025 and accordingly Vasco Police has issued Missing/ Lost Article Certificate dated 25-04-2025.

That any person/Bank/Financial Institutions are hereby requested to lodge any Objection if any with Original documents **within 7 days** of the publication or else Mr. Sreenivasulu Lakkipogu Ramaiah will be free to sell the above flat to any party or mortgaged the same with any Bank or Financial Institutions and no claims shall be entered by Mr. Sreenivasulu Lakkipogu Ramaiah.

Date: 26-04-2025

Sd/-
(**Adv Rajkumar N. Naik**)
Advocate and Notary
Shop no. 54, Second Floor,
Apna Bazar Bldg, Vasco da Gama, Goa.
Phone : 9637766337.

Sandeep Ads